Marathwada Mitra Mandal's
**COLLEGE OF ENGINEERING**
S.No.18, Plot No.5/3, Karvenagar, PUNE -52
**Accredited with "A++" Grade by NAAC**
Recipient of "Best College Award 2019" by SPPU
**Accredited by NBA (Mechanical, E&TC, IT, Electrical Engg.)**
**Recognized under section 2(f) and 12B of UGC Act 1956**

---

Ref. No.: - MMCOE/Admin/NOTIC/2024-25/65 Date: - 13/08/2024

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

अनुसूचित जाती (sc) प्रवर्गातीलविद्यार्थ्यांसाठी

**विषय : शै.वर्ष. २०२४-२५ पासून अनुसूचित जाती (sc) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजणेकरिता ऑनलाइन अर्ज करणे करिता सूचना.**

सर्व अनुसूचित जाती (sc) प्रवर्गातील शै.वर्ष. २०२४-२५ मध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, जे विद्यार्थी पुण्याबाहेरील रहिवाशी आहेत. त्या विद्यार्थ्यांना शासणामार्फत शासकीय वसतिगृहात प्रवेश दिला जातो. शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात राहण्याची व भोजनाची सोय मोफत केली जाते. व ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेशा करिता अर्ज केला होता परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही फक्त अशाच विद्यार्थांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वधार योजणेअंतर्गत महाविद्यालयाच्या वसतिगृहात किंवा महाविद्यालयाच्या बाहेर भाडे तत्वावर रहाणे करिता भोजन, निवास व निर्वाह भत्ता रु. ६०,००० वार्षिक दिला जातो.

म्हणून सर्व अनुसूचित जाती (sc) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे अश्या विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या वेबसाइटवर शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणे करिता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार यजनेचा लाभ मिळणे करिता ऑनलाइन अर्ज करावेत. ज्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेअभावी शासकीय वसतिगृहात निवड झाली नाही अशा विद्यार्थ्यांचे अर्ज प्रणालीद्वारे . डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार यजनेकरीता ग्राह्य धरले जाऊन नियमानुसार पुढील पडताळणी करिता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या लॉगिन वर अग्रेषित काले जातील व पात्र विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वधार यजनेचा लाभ दिला जाईल.

**पात्र विद्यार्थ्यांनी वरील वेबसाइटवर अर्ज भरावेत व आवश्यक कागदपत्रासह अर्जाच्या दोन प्रती महाविद्यालयात जमा कराव्यात.**

M. M. College of Engineering Pune-52

प्राचार्य

महाराष्ट्र शासन

# सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, पुणे

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, स.नं. १०४/१०५, विश्रांतवाडी पोलीस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे**

**दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११** E-mail:-acswopune@gmail.com

---

जा.क्र.सआसकपुणे/शिक्षण/स्वाधार/२०२४-२५/३३६५ दि.०२.०८.२०२४

प्रति,

अधिष्ठाता/संचालक / प्राचार्य / रजिस्ट्रार (सर्व),

कनिष्ठ/वरिष्ठ/व्यावसासिक/बिगर व्यावसासिक/वैद्यकीय/तंत्र महाविद्यालय,

पुणे जिल्हा.

विषय - सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृह व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीताची अवलंबवयाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेची कार्यपद्धती.

संदर्भ - मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. २४९४ दि.३१.०७.२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये समाज कल्याण विभागांतर्गत शासकीय वसतिगृहाचे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत आज्ञावली विकसनाचे (Software Development) काम प्रगतीपथावर असून यामध्ये विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे अर्ज ऑनलाईन स्विकृत करण्याबाबतचे मोडयुल दि.३०/०७/२०२४ पासून कार्यरत करण्यात आले आहे. त्यानुसार दि. ३१/०७/२०२४ पासून https://hmas.mahait.org या पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरता येणार आहेत. सन २०२४-२५ पासून नव्याने कार्यरत होत असलेले ऑनलाईन पोर्टल हे शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रीया तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीता एकत्रित तयार केले असल्याने शासकीय वसतिगृहास ऑनलाईन अर्ज करणाऱ्या ज्या पात्र अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेअभावी निवड शासकीय वसतीगृहात झालेली नाही अशा विद्यार्थ्यांचे अर्ज प्रणालीव्दारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीता ग्राह्य धरले जाऊन नियमानुसार पुढील पडताळणीकरीता संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या लॉगिनवर अग्रेषित केले जातील.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची माहिती महाविद्यालयांच्या सूचना फलकावर प्रदर्शित करावी तसेच समान संधी केंद्रप्रमुखांमार्फत सदर प्रक्रियेची माहिती अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांना द्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(विशाल लोंढे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. आयुक्त,समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

२. मा. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे - ०६

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-1
दूरध्वनी क्र.20-26127569 ईमेल - sakalyangovthostel@gmail.com

क्र.सकआ/शिक्षण/शावगृ/प्रवेश व स्वाधार/ पुणे, दिनांक:३१.०७.२०२४
ऑनलाईन प्रणाली/२०२४-२५/का-५अ/२४८४

## परिपत्रक

प्रति,
१. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
२. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)

विषय: सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृह व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीताची अवलंबवयाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेची कार्यपध्दती.....

संदर्भ: १) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सकआ/शिक्षण/शानिशा व शावगृ/पुर्व तयारी/ २०२४-२५/१५२१, दिनांक १९.०४.२०२४.
२) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सकआ/शिक्षण/शावगृ/सन २०२४-२५ प्रवेश प्रक्रीया/ २००२४-२५/का-५अ/१८७५, दिनांक ०५.०६.२०२४.
३) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. सकआ/शिक्षण/शावगृ/सन २०२४-२५ प्रवेश प्रक्रीया/ २०२४-२५/का-५अ/२१९१, दिनांक ०१.०७.२०२४.
४) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सकआ/शिक्षण/शावगृ/सन २४-२५ प्रवेश प्रक्रीया/ वेळापत्रक-परिपत्रक/२०२४-२४/का-५अ/२२७४, दिनांक ०६.०७.२०२४.

उपरोक्त विषयानुसार आयुक्तालयाचे संदर्भ परिपत्रक क्र.१, दिनांक १९.०४.२०२४ अन्वये नवीन शैक्षणिक वर्षाच्या पुर्वतयारीसाठी आवश्यक बाबींचे पुर्वनियोजन करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

आयुक्तालयाचे संदर्भीय परिपत्रक क्र.२, दिनांक ०५.०६.२०२४ अन्वये सन २०२४-२५ या वर्षातील शासकीय वसतिगृहाचे प्रवेशाबाबतची प्रक्रीयेबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तसेच आयुक्तालयाचे संदर्भ परिपत्रक क्र.३, दिनांक ०१.०७.२०२४ अन्वये सन २०२४-२५ या वर्षातील शासकीय वसतिगृहाचे प्रवेशाबाबत वेळापत्रक (व्यवसायिक अभ्यासक्रम वगळून) निर्गमित करण्यात आलेले आहे व प्रवेश प्रक्रीयेबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच आयुक्तालयाचे संदर्भ परिपत्रक क्र.४ दिनांक ०६.०७.२०२४ अन्वये सन २०२४-२५ या वर्षातील शासकीय वसतिगृहाचे प्रवेशाबाबत सुधारीत वेळापत्रक (व्यवसायिक अभ्यासक्रम वगळून) निर्गमित करण्यात आलेले आहे व प्रवेश प्रक्रीयेबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.



CamScanner

वरील संदर्भ क्र.३ व ४ चे परिपत्रकामध्ये व्यवसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेशाचे वेळापत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. आता या परिपत्रकान्वये शासकीय वसतिगृहातील व्यवसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेशाचे वेळापत्रक यासोबत निर्गमित करण्यात येत आहे. याबाबत सूचित करण्यात येते की,

अ) शासकीय वसतिगृहाचे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियाबाबत आज्ञावली विकसनाचे (Software Development) काम प्रगती पथावर असून यामध्ये विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे अर्ज ऑनलाईनरित्या स्विकृत करण्याबाबतचे मोड्यूल महाआयटी व्दारे दिनांक ३०.०७.२०२४ पासून कार्यरत झालेली आहे. त्यानुसार दिनांक ३१.०७.२०२४ पासून **https://hmas.mahait.org** या पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरता येणार आहेत.

ब) ऑनलाईन पोर्टलचे हे प्रथम वर्ष असल्याने चालू वर्ष सन २०२४-२५ करीता व्यवसायिक अभ्यासक्रमात अथवा अव्यावसायिक अभ्यासक्रमात शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्ज पोर्टलवरून डाऊनलोड करून त्याची प्रिंट घेऊन देखील संबंधीत वसतिगृह किंवा सहाय्यक आयुक्त कार्यालयास ऑफलाईनरित्या सादर करणे आवश्यक आहे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक ३१.०७.२०२४ पूर्वी थेट संबंधीत वसतिगृहात ऑफलाईन अर्ज सादर केले असतील त्यांनीदेखील ऑनलाईन अर्ज उपरोक्त पोर्टलव्दारे भरणे आवश्यक असून ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंटप्रत संबंधीत वसतिगृह किंवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील जेणेकरून संपुर्ण प्रवेश प्रक्रीयेचे सुनियंत्रण करणे शक्य हाईल.

ब) शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियाबाबत खालीलप्रमाणे सूचना या परिपत्रकाव्दारे निर्गमित करण्यात येत आहेत. त्याचे तंतोतंत पालन सर्व संबंधितांनी करावे व वसतिगृह प्रवेशाबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी व समस्या निर्माण होणार नाहीत याची गांभीर्याने दखल घेण्यात यावी.

१. सर्व प्रवेश प्रक्रिया शासकीय वसतिगृहनिहाय ऑनलाईन पोर्टलव्दारे करावी. पोर्टलव्दारे तयार होणाऱ्या अंतिम निवड यादीस नियमानुसार संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी खात्री करून मान्यता प्रदान करावी.

२. दि. १६ मे १९८४ व त्यानंतर वेळोवेळी आतापर्यंत निर्गमित झालेल्या प्रचलित शासन निर्णयाच्या अधिन राहून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जांची प्रिंट कॉपी स्विकारणे, छाननी करणे इत्यादीचे नियोजन सहाय्यक आयुक्त यांनी करावे.

४. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी वृतपत्रामध्ये ऑनलाईन पोर्टल सुरू झाल्याबाबतची बातमी आणि जाहिरात देवून याबाबतची प्रसिध्दी दयावी. सदर प्रसिध्दी देतांना सन २०२४-२५ मध्ये जिल्हानिहाय व वसतिगृहनिहाय व प्रवर्गनिहाय किती जागा रिक्त आहेत हे स्पष्ट नमूद करावे.

५. प्रचलित नियमानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी आणि खासबाब करिताच्या जागा रिक्त ठेवाव्यात. खास बाब करीता उपलब्ध होणाऱ्या प्रवर्गनिहाय जागा आयुक्तालयास कळविण्यात याव्यात.

६. सन २०२४-२५ या वर्षाची रिक्त जागांची स्थिती नव्याने तयार करण्यात आलेल्या पोर्टलमध्ये संबंधीत वसतिगृहाच्या गृहप्रमुख/गृहपाल यांनी त्यांच्या लॉगईनव्दारे भरावी व सदर माहिती संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी त्यांच्या लॉगईन मध्ये तपासून मान्य करावी.



CamScanner

७. प्रवेश प्रक्रिया सुरळीत व व्यवस्थित होणेसाठी सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी गृहपालांची बैठक घेवून त्यांना सविस्तर सूचना निर्गमित कराव्यात.

८. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या बँकेचे खाते क्रमांक, आधार क्रमांक, बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न करुन घेण्याची जबाबदारी गृहपालांची असेल. या बाबींकडे विशेष लक्ष द्यावे.

९. सदर नोटीस / सूचना प्रत्येक सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण / प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण तसेच प्रत्येक शासकीय वसतिगृह आणि सदर वसतिगृहाच्या परिसरातील सर्व महाविद्यालयांच्या सूचना फलकावर ही प्रदर्शित करावी.

१०. वसतिगृह असणाऱ्या शहरातील विविध शाळा/ कॉलेजच्या प्रवेश प्रक्रीयाचे वेळापत्रक लक्षात घ्यावे, त्यानुसार वसतिगृह प्रवेश वेळापत्रकामध्ये प्रादेशिक उपआयुक्त/ सहाय्यक आयुक्त यांना सुसंगत व अंशत: बदल करता येईल मात्र याचे कारण त्यांच्या आदेशात नमूद करणे आवश्यक राहील.

११.राज्यातील काही ठिकाणी जिल्ह्यातील तालुकास्तरावरील अथवा जिल्हा स्तरावर केवळ एकच व्यावसायीक अभ्यासक्रमाचे महाविद्यालय कार्यरत असेल व त्यामधील सर्व प्रवेश प्रक्रीया देखील पुर्ण झाली असेल, अशा महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थ्यांकरीताची त्या ठिकाणी असलेल्या शासकीय वसतिगृहांची गुणवत्ता यादी संबंधीत सहाय्यक आयुक्त यांनी त्या त्या वेळी मान्यता देऊन प्रसिध्द करावी व अशा परिस्थितीत पुर्ण राज्याच्या प्रवेश प्रक्रीयेच्या गुणवत्ता यादी प्रसिध्द होणेकरीता थांबण्याची आवश्यकता नाही.

१२.सन २०२४-२५ पासून नव्याने कार्यरत होत असलेले ऑनलाईन पोर्टल हे शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रीया तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीता एकत्रित तयार केले असल्याने शासकीय वसतिगृहास ऑनलाईन अर्ज करणाऱ्या ज्या पात्र अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेअभावी निवड शासकीय वसतीगृहात झालेली नाही अशा विद्यार्थ्यांचे अर्ज प्रणालीव्दारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीता ग्राह्य धरले जाऊन नियमानुसार पुढील पडताळणीकरीता संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या लॉगईनवर अग्रेषित केले जातील.

१३.सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण लॉगईन वरील प्राप्त झालेले भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अर्जाची ऑनलाईन पडताळणी योजनेच्या निकषानुसार संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी करावयाची आहे.

१४. सदर योजनेच्या ठळक निकषांनुसार विद्यार्थ्यांनी त्यांच्या माहिती पोर्टलवरील लॉगईनमध्ये परिपुर्ण भरली आहे याबाबतची खातरजमा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी ऑनलाईनरित्या करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी सदर माहिती अपुर्ण भरली असल्यास संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाने असे अर्ज परिपुर्ण करण्याकरीता विद्यार्थ्यांच्या लॉगईनला ऑनलाईन रिव्हर्ट (Revert) करणे आवश्यक राहील.

१५.तसेच ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज योजनेच्या निकषांमध्ये न बसणारे आहेत, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयामार्फत थेट अपात्र ठरवावेत.

तेव्हा उपरोक्त विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार शासकीय वसतिगृह प्रवेश तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीताची प्रवेश प्रक्रीया सन २०२४-२५ पासून अवलंबवावी.



CamScanner

ऑनलाईन प्रणालीचे हे प्रथम वर्ष असल्याने कार्यालय स्तरावर काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास प्रणालीचे तांत्रिक कक्ष MahaIT यांच्या support@mahaonline.gov.in या ई मेलवर थेट संपर्क साधून त्रूटीचे निराकरण करून घ्यावे.

सोबत: व्यवसायिक अभ्यासक्रमचे वसतिगृह प्रवेश वेळापत्रक

31-07-24

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत : माहितीस्तव.

१. मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई ३२.

प्रत: कार्यवाहीस्तव.

१. प्रकल्प अधिकारी, महाआयटी कॉर्पोरेशन लिमिटेड, एपीजे हाऊस, चर्चगेट, मुंबई १.



CamScanner

# शासकीय वसतिगृहाचे सन २०२४-२५ मधील व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे वेळापत्रक

| बाब | प्रवेशासाठी अर्ज करावयाचा दिनांक | पहिली निवड यादी अंतिम करणे व प्रसिद्ध करणे | पहिल्या निवड यादी नुसार विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची अंतिम मुदत | रिक्त जागेवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांची गुणवंतेनुसार निवड यादी प्रसिद्ध करणे. | दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांनां प्रवेश देणे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| व्यावसायीक अभ्यासक्रम | ३०.०८.२०२४ पर्यंत | ०४.०९.२०२४ | १०.०९.२०२४ पर्यंत | १३.०९.२०२४ | १९.०९.२०२४ पर्यंत |

टिप: प्रवेशाच्या जागा शिल्लक राहील्यास मुदत संपल्यानंतर अर्ज स्विकारता येतील व पुढील प्रत्येक आठवडयात एक याप्रमाणे दोन निवड यादी जाहिर करण्यात यावी.

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.



CamScanner